वसी भूगोलाची व्याख्या स्वरूप व्याप्ती स्पष्ट करा

प्रस्तावना :

वस्ती भूगोल ही मानवी भूगोलाची एक महत्वपूर्ण शाखा आहे. वस्ती भूगोलात मानवि वस्त्यांचा अभ्यास केला जातो. कोणत्याही प्रदेशातील वस्तीच्या स्वरूपावर त्या प्रदेशातील पर्यावरणाचा सखोल असा परिणाम होत असतो म्हणुन त्या त्या पर्यावरणरूप मानवि वस्तीचे स्वरूप आढळत असते. स्थलानुसार व कालानुसार विविध क्षेत्रात होत असलेली प्रगती वस्तीमधुन प्रतिबिंबित होत असते. वस्तीमध्ये मानवाचा पर्यावरणाशी असलेला संबंध प्रतिबिंबित होतो. एवढेच नाही तर मानवि समाजाच्या धार्मिक, सामाजिक आणी संस्कृतिक प्रथा किंवा चालिरीतीही प्रतिबिंबित होत असतात. मानवि भूगोलात मानवनिर्मित अशा खेडी, नगरे व शहरे यांच्या अभ्यासास महत्व आहे

ज्याप्रमाणे भूगोलात काय? कोठे? व कसे? अशा प्रश्नांची उत्तरे अपेक्षित असतात त्याच-प्रमाणे वस्ती भूगोलदेखिल या प्रश्नाशि संबंधित असते. म्हणजे The Settlement Geography' is concerned with " who build / inhabit settlement, where & now. यात who म्हणजे 'मानव' असुन वस्ती भूगोलात वस्ती इतकेच मानवाला महत्वाचे स्थान आहे. कारण मानवाशिवाय वस्तीचा विचार केला जाऊ शकत नाही कारण वस्तीवर मानवि संस्कृतिचा व मानवाच्या बौध्दिक विकासाचा परिणाम होत असतो. म्हणजे मानवाने वस्तीची बांधणि किंवा रचना कशि केलि? कोठे केलि इ. प्रश्नाचे उत्तरे वस्ती भूगोलाकडुन अपेक्षित असत या अभ्यासाला वस्ती भूगोल म्हणुन संबोधले जाते

## वसी भूगोलाची व्याख्या: (Definitions of Settl...

हवा, पाणी, अन्न, वस्त्र, निवारा, शि... आणी आरोग्य या मानवाच्या मूलभूत गरजा म्हणुन सद्य : परिस्थितीत ओळखल्या जातात. प्राचिन काळात मानवाला फक्त हवा पाणी अन्न याच गोष्टींची आवश्यकता होती. नंतरच्या काळात मानवामध्ये जसजसा बौद्धिक विकास होत गेला तसतसे त्याच्या गरजात भर पडत गेली.

① डिकिन्सन :

" शेतवाड्या, गृहसमूह, नगरे इ. मानवि समाजात आवश्यक असलेल्या सामाजिक भौगोलिक घटकांचे क्षेत्रिय व्यवस्था म्हणजे वसी होय "

② वसीच्या (ग्रामिण आणी नागरी) भौगोलिक दृष्टिकोनातुन अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे वसी भुगोल होय

③ मानवाच्या आश्रयस्थानास वसी असे म्हणतात.

④ मानवाने निवाऱ्याकरिता केलेल्या घरांच्या समूहाची मांडणि म्हणजे वसी होय

⑤ वसी भुगोल म्हणजे, " ग्रामिण व नागरि वस्त्यांचे स्थान, स्थिती, प्रकार, कार्ये व स्वरुप यांचा अभ्यास करणारे शास्त्र होय.

⑥ स्थल व काल संदर्भात केला जाणारा वस... वसीचा अभ्यास म्हणजे वसी भुगोल होय.

Page No. | Date

## वसी भूगोलाचे स्वरूप :

### ① वर्णनात्मक स्वरूप :

आतिप्राचीन काळात वसीच्या अभ्यासाकडे भूगोल व शास्त्राद लक्ष देण्यात आले होते तरि पुर्विपासुनच वस्त्यांचा अभ्यास केला जात होता प्राचीन काळात काही शास्त्रज्ञांनि वस्त्यांच्या अभ्यासावर भार दिला होता; परंतु हा सर्व अभ्यास वर्णनात्मक स्वरूपाचा होत ~~आले~~ आहे

### ② ऐतिहासिक स्वरूप :

वसत्यांचा उदय मानवि जिवनाच्या इतिहासांशि संबंधीत असुन मानव पृथ्वीवर जन्माला आल्यापासुन मानवि वसीच्या आरंभ झाला असे म्हणावे लागेल. कारण सुरुवातीच्या काळात मानवाने वृक्षांचा गुहेचा विश्रांतीसाठी किंवा संरक्षणासाठी उपयोग केला. नंतर मानवि संस्कृतीच्या जसजसा विकास होऊ लागला तसतसा तो वसीचा किंवा आश्रयांचा प्रकार बदलू लागला. पशुपालन अवस्थेत तो कातडे तंबून राहू लागला. कृषिच्या उदय झाल्यावर मानव स्थिरावला म्हणजेच त्याची भटकि अवस्था समाप्त झाली. यातुनच तो सभोवताली उपलब्ध असलेल्या साहित्यापासुन तयार केलेल्या स्थिर स्वरूपाच्या झोपडयात राहू लागला. काळाच्या ओघात मानवाने वसीच्या स्वरूपात सुधारणा केलि. अशाप्रकारे वसी भुगोलाचे स्वरूप ऐतिहासिक स्वरूप म्हणुन ओळखले जाते.

### ③ क्षेत्रिय अभ्यासपध्दति स्वरूप –

सुरुवातीपासुनच काही भुगोल तज्ञांनि वसत्यांच्या क्षेत्रिय अभ्यासाला.

महत्व दिले आहे. भूगोल तज्ञांच्या मते वस्ती भूगोलात अनेक विषयांत समाविष्ट आणी हे विषय एकमेकांशी संबंधित आहेत उदा. वस्तीचे स्थान, स्थिती, कार्य, वितरण इ. विस्ताराने आणी सखोल पध्दतीने अभ्यास करणे आवश्यक आहे होणाऱ्या समस्या पाहून त्यांचा क्षेत्रिय पध्दतीने अभ्यास होणे आवश्यक याबाबत वस्ती भूगोलाच्या अभ्यासाचे क्षेत्रिय स्वरूप म्हणुन संबोधले होते.

## ③ वितरणात्मक स्वरूप :

जगात वस्त्याची सर्वत्र आढळत असल्या तरि त्याचे वितरण समान झालेले नाही कारण काही भागात वस्तीची संख्या ~~कमी~~ जास्त असुन त्यांची संख्या पण व वस्त्याचा आकार मोठा आहे तर काही भागात वस्त्यांची संख्या कमि असून त्यांची संख्या पण तुरळक भूग वस्त्याच्या संख्येवर व दाटिवर भौगोलिक व आर्थिक घटकांचा प्रभाव पडत असतो पृथ्वीवर सर्वत्र भौगोलिक व आर्थिक घटक सारखेच नसतात. यामुळे जगात सर्वत्र वसत्याचे वितरण समान आढळून येत नाही उदा. वाळवंटी प्रदेशात अत्यंत विरळ व लहान आकाराच्या वस्त्या आढळून येतात तर नद्यांच्या खोऱ्यात, सुपिक मृदेच्या प्रदेशात औद्योगिक प्रगत प्रदेशात वस्त्यांची संख्या जास्त असते व आकारही मोठे असते यावरुन वस्ती भूगोलाचे वितरणात्मक स्वरूप स्पष्ट होते.

## ④ सर्वकष स्वरूप :

वस्ती भूगोलाचा अ सर्वांगिन आहे कारण वस्तीचा अभ्यास

करताना कोणतीही एकच घोरणाचा अभ्यास पुर्वी होता करता येत नाही वस्तीचा अभ्यास करताना

## (5) क्षेत्रिय अभ्यासपद्धतीचे स्वरूप :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासूनच काही भूगोल तज्ञांनी वस्तीच्या क्षेत्रिय अभ्यासाला महत्व दिले आहे. वस्ती भूगोल तज्ञांच्या मते वस्ती भूगोलात अनेक विषय समाविष्ठ आहेत आणी हे विषय एकमेकांशी संबंधित आहेत उदा.

वस्तीचे स्थान स्थिती, कार्ये, विकास तोचित वाहतूक व्यवस्था, प्रशासन इ. वस्त्यांच्या सखोल व विस्ताराने अभ्यास होणे आवश्यक आहे औद्योगिकीकरणानंतर वस्त्यांची होत असलेली प्रगती विशेषत: नागरि वस्त्यांची व यातून निर्माण होणाऱ्या समस्या पाहता वस्त्यांच्या क्षेत्रिय पध्दतीने अभ्यास करणे आवश्यक आहे. यावरुन वस्ती भूगोलाचे क्षेत्रिय अभ्यासपध्दती स्वरूप स्पष्ठ होते.

## (Scope of Settlement Geography):
## वस्ती भूगोलाची व्याप्ती :

वस्ती भूगोल व्याप्ती अभ्यास करताना त्यामध्ये कोणकोणते विषयाचा अभ्यास करता येतो याचा विचार करावा लागतो एखाद्या विषयाची व्याप्ती ही त्या विषयाच्या अभ्यास विषयावर किंवा विषय सामग्रीवर अवलंबून असते म्हणजे एखाद्या विषयात अनेक घटकांचा अभ्यास केला जात असेल तर त्या विषयाची व्याप्ती जास्त असते तर अल्प एखाद्या विषयात कमी घटकांचा अभ्यास

केला जात असेल तर त्या विषयाची व्याप्ती कमी असते याशिवाय त्या विषयाचा इतर संबंधित शास्त्रांशी असणारा संबंधही महत्वाचा असतो जितका जास्त विषयाशी संबंध तितकी व्याप्ती जास्त असते किंवा मर्यादित असते वस्ती भुगोलाची व्याप्ती मोठी दिसुन येते.

① वस्तीच्या उत्पत्तीचा अभ्यास :-

वस्ती भुगोलात वस्तीच्या उत्पत्तीचा अभ्यास केला जातो. मानव पृथ्वीवर जन्माला आल्यापासुनच वस्तीचा उदय झाला असे म्हणतात. पृथ्वीवर मानवाचा जन्म झाला वस्तीचा उदय झाला असे म्हणतात येईल कारण सुरुवातीच्या काळात मनुष्य हा स्वतःचे संरक्षण करण्यासाठी झाडांचा किंवा गुहेचा वापर करत होता आणी हिच त्याची वस्तीची सुरुवात होती असे म्हणता येईल कालांतराने मानवामध्ये जस जसा बौद्धिक विकास होत गेला तस तसे त्याच्या वस्तीत परिवर्तन होत गेले म्हणुनच वस्तीच्या उत्पत्तीचा अभ्यास करणे हे वस्ती भुगोलामध्ये महत्वाचे कार्य आहे.

* वस्तीचे प्रकार :-

जगामध्ये ज्या वस्त्या आढळून येतात त्या सर्व सारख्या नाही कारण वस्तीच्या प्रकारावर त्या ठिकाणी असणा भौगोलिक परिस्थितीचा किंवा घटकाचा प्रभाव पडतो त्यामुळे काही भागात विखुरलेल्या वस्त्या काही भागात सघन वस्त्या, सामीप्य वस्त्या काही ठिकाणी अपकेंद्रित

आढळतात वस्ती भुगोलात या सर्व प्रकारच्या वस्त्यांची जि काही वैशिष्ट्ये आहेत त्याचा अभ्यास केला जातो.

**वस्तीचे स्थान / ठिकाण :-**

वस्ती भुगोलात वस्ती कोणत्या ठिकाणी निर्माण झाली आहे त्या ठिकाणाचा किंवा स्थानांचा अभ्यास केला जातो वस्तीच्या ठिकाणानुसार वस्तीचा आकार लहान आहे कि मोठा तसेच ति वस्ती दाट आहे कि विखुरलेली आहे याचा अभ्यास केला जातो बऱ्याच वेळी वस्तीच्या ठिकाणाचा परिणाम हा वस्तीच्या आकारावरती होत असतो. या सर्व घटकांचा अभ्यास वस्ती भुगोलात केला जातो.

**वस्तीचे पारूपे किंवा आकार :-**

वस्ती भुगोलामध्ये वस्तीला मिळालेल्या विशिष्ट आकाराचा अभ्यास केला जातो म्हणजे वस्तीला प्राप्त झालेला विशिष्ट आकार यालाच वस्तीचे पारूपे असे म्हणतात. वस्तीला एखादा आकार प्राप्त होण्यासाठी अनेक घटक कारणीभूत आहेत. उदा :- भौगोलिक व मानवी.

**वस्तीची वाढ व कार्य :-**

एखादया वस्तीची वाढ होण्यासाठी त्याला कारणीभूत असणारे घटक कोणकोणते आहेत याचा अभ्यास करावा लागतो तसेच जगामध्ये प्रत्येक वस्तीत त्या-त्या प्रदेशाचा अनुसरून काही छोटे-मोठे व्यवहार होतात असतात वस्तीमध्ये होणारा या व्यवहाराला वस्तीचे कार्य म्हणतात.

## वस्तीचा विकास व परिणाम :

ज्या प्रमाणामध्ये मानवामध्ये शिशु अवस्था बाल्य अवस्था, कुमार अवस्था, तारुण्य अवस्था प्रौढ अवस्था वृद्ध अवस्था याच प्रमाणे अशाच अवस्था काही प्रमाणात वस्तीच्या बाबतीत आढळून येतात वस्तीचा उदय वस्तीचा विकास आणी ऱ्हास या प्रक्रियेत आढळून येणाऱ्या सर्व अवस्थांचा अभ्यास वस्ती भूगोलात करावा लागतो.

## वस्त्यांचे आगतिकीकरण वितरण :

वस्ती भूगोलात वस्त्यांचे आगतिकिकरण वितरणाच्या अभ्यासाला महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे कारण या वरूनच विकसित व अर्धविकसित अविकसित निर्मनुष्य प्रदेश हे स्पष्ट करण्यास मदत होते म्हणुन वस्त्यांचे आगतिक वितरण हा घटक वस्ती भूगोलात महत्वाचा अभ्यास विषय आहे.

या वरून आपल्या असे लक्षात येते कि वस्ती भूगोलाची व्याप्ती ही फार मोठी आहे.